साप्ताहिक
# परळी परिसर
Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25
* परळी वैजनाथ * मंगळवार, दि. ०३ जून २०२५ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com


शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## आ.धनंजय मुंडेंच्या प्रयत्नांना यश; धर्मापुरी किल्ला संवर्धनासाठी 3 कोटी ३९ लाखाचा निधी

मुंबई (बातमीदार):- माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून पर्यटन विभागाकडून परळी मतदारसंघातील प्रसिद्ध धर्मापुरी किल्ल्याच्या संवर्धन व जतन कामासाठी तीन कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी खर्चनास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने मागणी केली होती. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी धर्मापुरी किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी एकूण नऊ कोटी रुपयांची मागणी केली होती त्यापैकी साधारण तीन कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी खर्च शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आले आहे. त्याचबरोबर अंबाजोगाई शहरालगत असलेल्या पुरातत्व विभागांनी विशेष भाग म्हणून घोषित केलेल्या सकलेश्वर मंदिर अर्थात बाराखडी नावाने प्रसिद्ध असलेल्या स्थळाच्या विकासासाठी सुमारे ३५ लाख रुपये, तसेच सुप्रसिद्ध खोलेश्वर मंदिर परिसराच्या विकासासाठी सुमारे ४५ लाख रुपये निधी करतात शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये धनंजय मुंडे यांनी धर्मापुरी किल्ल्यासह बारा खांबी मंदिर व खोलेश्वर मंदिर यांच्या परिसराच्या विकासासाठी निधी देण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना विनंती केली होती. धर्मापुरी येथील भुईकोट किल्ला हा सुप्रसिद्ध असून पर्यटनाच्या दृष्टीने तो अत्यंत उपयुक्त आहे. मात्र मागील अनेक वर्षांपासून नागरी सुविधांमुळे तो वंचित राहिलेला आहे. या किल्ल्याच्या संवर्धनासह येतील ऐतिहासिक ठेवा जोपासण्याच्या उद्देशाने, तेच प्राचीन महत्त्व असलेले बारा खांबे मंदिर व खोलेश्वर मंदिर यांच्या जीर्णोद्धाराचा व या परिसराच्या विकासाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे सर्वस्तरातून धनंजय मुंडे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. ***

## लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त रामायणाचार्य श्री.रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन



परळी वैजनाथ, (बातमीदार):- दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त मंगळवारी (दि.३) परळी तालुक्यातील पांगरी येथील गोपीनाथगडावर रामायणाचार्य ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांचे किर्तन व त्यानंतर महाप्रसाद तसेच इतर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकनेत्यास अभिवादन व किर्तनाच्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मुंडे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, या निमित्ताने गोपीनाथ गडावर रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबीर, पशुसंवर्धन शिबिर, वृक्षारोपणासाठी वृक्षांचे वितरण आदी कार्यक्रमही होणार आहेत. या कार्यक्रमाची तयारी पूर्ण झाली आहे. राज्यभरातील कार्यकर्ते, नागरिक लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन करण्यासाठी गोपीनाथगडावर येणार आहेत. त्यामुळे मोठी गर्दी येथे उसळणार आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खा.प्रितमताई मुंडे यांच्यासह गोपीनाथ मुंडे परिवारातील सदस्य, पक्ष कार्यकर्ते यावेळी उपस्थित राहणार आहेत. ****

## स्वामी विवेकानंद पतसंस्थेत आणखी सव्वादोन कोटींचा घोटाळा उघडकीस; १५ जणांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई (बातमीदार):- विविध घोटाळ्यांमुळे वादग्रस्त ठरलेल्या अंबाजोगाई येथील स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेतील आणखी एक मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आसुन पतसंस्थेत सन २००० ते २०१२ या कालावधीत एकूण २ कोटी २९ लाख ९३ हजार ७१७ रुपयांचा अपहार व गैरव्यवहार झाल्याचे विशेष लेखापरीक्षक सतीश काकासाहेब पोकळे यांनी केलेल्या चाचणी लेखापरीक्षणातून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी एकूण १५ जणांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पतसंस्थेचे तत्कालीन अध्यक्ष कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याच्या कार्यकाळातच सर्वाधिक गैरव्यवहार झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सतीश पोकळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पतसंस्थेच्या लेखापरीक्षणात बँक खात्यांतील व्यवहार, रोजकिर्दीतील नोंदी आणि चेक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर विसंगती आढळल्या. काही व्यवहार बँक स्टेटमेंटमध्ये असूनही रोजकिर्दीत नाहीत, काही चेक क्र. नसलेल्या नोंदी आहेत, तर काही रक्कमा रोजकिर्दीत असून बँकेत जमा झाल्याचे पुरावे नाहीत. यामुळे संस्थेच्या आर्थिक विश्वसनीयतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. लेखापरीक्षकांच्या अहवालानुसार, संस्थेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि बँकेतील कर्मचाऱ्यांनी संगनमत करून संस्थेच्या निधीचा अपहार केला. अपहाराची सुरुवात आर्थिक वर्ष २००६ ०७ पासून झाली असून, संस्थेच्या तत्कालीन प्रमुख पदांवर कार्यरत असलेल्या कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याच्या कार्यकाळातच सर्वाधिक गैरव्यवहार झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. कुरेशी सोबतच या गुन्ह्यात सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेचा माजी अध्यक्ष भोसले विकास प्रभाकर, प्रभाकर नरबा आरसुडे, महादेव मुकुंदराव मुंडे, कर्मचारी शिवहर महादेव अप्पा आकुसकर यांच्या सह १५ जणांवर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात शासकीय लेखापरीक्षण सतिश पोकळे यांनी गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे पंधरा पैकी दहा जण हे अंबाजोगाई डीसीसी बँकेतील कर्मचारी आहेत. यामध्ये एस.एस. लांडगे (अकॉउंट), यु.डी. देशमुख (इन्स्पेक्टर), ए.एस. पवार (लिपीक), एम.एस. सावरे (लिपीक), एम. आर. कदम (लिपीक), बी. एस. बांगर (सिनियर इन्स्पेक्टर), के. एम. केकान (लिपीक), यु.एस. नागरगोजे (लिपीक), एस.आर. खाडे (एजंट) आणि ए.एन. वाभळे (लिपीक) याचा समावेश आहे. आयपीसी ४०६, ४०९ आणि ३४ भादविनुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घोटाळ्याचा मुख्य सुत्रधार सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेचा संस्थापक अध्यक्ष कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल असून स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेत २ कोटी २९ लाख ७१७ रूपयांचा घोटाळा करून कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याने सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्था स्थापन केल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, आतापर्यंत स्वामी विवेकानंद पतसंस्थेमधील आठ कोटीहून अधिकचा घोटाळा उघडकीस आल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.*

## सचिन शिवाजीराव देशमुख यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीशपदी नियुक्ती



परळी वैजनाथ, (बातमीदार):- मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीशपदी औरंगाबाद खंडपीठातील ज्येष्ठ विधीज्ञ सचिन शिवाजीराव देशमुख पोहनेरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यासंदर्भातील अधिसूचना सोमवारी केंद्रीय विधी व न्याय मंत्रालयाकडून निघाली आहे. या मंत्रालयाचे सहसचिव जगन्नाथ श्रीनिवासन यांच्या स्वाक्षरीने ही अधिसूचना निघाली आहे. हा मराठवाड्यासह बीड जिल्ह्याचा बहुमान ठरला आहे. १ जून १९७६ रोजी परळी वैजनाथ येथे जन्मलेले सचिन देशमुख यांनी १९९९ मध्ये पुणे विद्यापीठातून विधी शाखेची पदवी तर २००८ साली मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी (एलएलएम) प्राप्त केली. ॲड. पी. एन. जोशी यांच्याकडे त्यांनी ज्युनिअर म्हणून वकिलीस सुरुवात केली. खंडपीठात ते मागील २४ वर्षापासून ज्येष्ठ विधिज्ञ म्हणून कार्यरत होते. छत्रपती संभाजीनगरच्या पाणी प्रश्नावर खंडपीठातील जनहित याचिकेत सचिन देशमुख यांनी ॲमॅकस क्युरी (न्यायालयीन मित्र) म्हणून काम पाहिले आहे. सचिन देशमुख यांचे शालेय शिक्षण परळीतील वैद्यनाथ विद्यालयात झाले. याच विद्यालयातील मुख्याध्यापक दिवंगत शिवाजीराव देशमुख यांचे ते सुपुत्र आहेत. सचिन देशमुख यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे येथे अभिनंदन होत आहे. **

## MPSC परीक्षेत यश मिळऊन परळीतील सिद्धार्थ देशमुख यांची कक्ष अधिकारीपदी निवड



परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा २०२३ च्या परीक्षेत यश मिळऊन येथील सिद्धार्थ सुवर्णा माणिकराव देशमुख यांची कक्ष अधिकारी या राजपत्रित अधिकारीपदी निवड झाली आहे. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेले सिद्धार्थ देशमुख सध्या माझगाव मुंबई येथे एस.टी.आय.म्हणून कार्यरत आहेत. त्यांची राजपत्रित कक्ष अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल येथे त्यांचे मित्र, नातेवाईक व कुटुंबियांकडून अभिनंदन होत आहे. सिद्धार्थ देशमुख यांचे येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन प्राथमिक व न्यू हायस्कूल शाळेत शिक्षण झाले आहे.

दरम्यान, येथील सामाजिक कार्यकर्ते व मराठा सेवा संघाच्या शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.एम.एल.देशमुख यांचे ते चिरंजीव आहेत. ***

## दोन वेळा उद्घाटन तरी परळी बसस्थानकाची दैना फिटेना! कामाला तात्काळ सुरूवात करा-ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ (बातमीदार):- बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग परळी शहरात आहे. परंतु येथील बसस्थानकाची दयनीय अवस्थेचे रूप सामान्य नागरिकांसह लाल परी साठी वाट पाहणाऱ्या प्रवाशांना दिसू लागले आहे. परळी बस स्थानकाचे दोन वेळा उद्घाटन आजी माजी मंत्र्यांच्या हस्ते संपन्न होऊन सुद्धा बस स्थानकाची दैना आता तरी फिटणार का असा सवाल उपस्थित करून बस स्थानकाच्या आधुनिक कामास सुरुवात करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी परळी बस डेपोचे आगार प्रमुख यांच्याकडे केली आहे.



पावसाळ्याच्या दिवसांमध्ये बशस्थानकाची अत्यंत वाईट अवस्था पाहायला मिळत आहे. बसस्थानकाच्या परिसरात खड्ड्यांचे साम्राज्य झाले असून त्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर साठले जात आहे. खड्डे खूप मोठे आहेत ते बुजवले गेले आहेत.त्यामध्ये मुरूम टाकला नाही त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास भोगावा लागत आहे. बाहेर राज्यातील भाविक भक्त दर्शनासाठी परळीमध्ये येतात. परळीची प्रतिमा त्यांच्या नजरेत आणि मनात कमी होते त्यासाठी विकास कामे वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे म्हणून बस स्थानक हे आधुनिक होणे गरजेचे आहे. प्रवाशांना सोय सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे त्यामुळे कामास सुरुवात करावी आणि गती देऊन वेळेत पूर्ण करावे अशी मागणी त्यांनी परळी डेपोच्या आगार प्रमुखाकडे केली आहे. **

संपादकीय...

# यंदा दमदार बरसणार..!

**✻ सुविचार ✻**
**पायाला झालेली जखम जपून चालायला शिकवते, आणि मनाला झालेली जखम आयुष्य जगायला शिकवते!**

यंदाच्या भर उन्हाळ्यात म्हणजे मे महिन्यात प्रारंभीपासून आपल्याकडे कुठे मुसळधार, कुठे धो-धो तर कुठे ढग फुटी सदृश्य पाऊस बरसतो आहे. या पावसाबरोबर ढग आणि विजांचा कडकडाट होतो आहे. या बरोबरच वादळी वारेही मोठ्या प्रमाणात वहात आहेत. संपूर्ण महिनाभर भर उन्हाळ्यात आपण पावसाळा अनुभवत आहोत. हा पाऊस अवेळीचा म्हणजेच अवकाळी आहे की हवेच्या कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे बरसणारा आहे की मान्सून पूर्व पाऊस आहे, हे अद्याप आपल्याला उलगडले नाही. जागतिक तापमान वाढीमुळे बदललेले हवामान व ऋतुचक्राचा परिणाम म्हणजे हा पाऊस असल्याचे काही तज्ज्ञ सांगतात. संपूर्ण मे महिना या पावसामुळे थंड गेला हा पाऊस आपल्याला थंडावा देणारा ठरला असला तरी त्याने मोठे नुकसान केले आहे. केशर व इतर आंबा उत्पादकांना याचा मोठा फटका बसला. शिवाय टरबूज, खरबूज याचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांचे नुकसान केले. शेतात वाळू घातलेल्या पिकांचे नुकसान हा पाऊस करून गेला. उन्हाळी कांदा व इतर पिकांचा तसेच फुलशेतीचा जागेवरच चिखल या पावसाने केला. पेरणी पूर्व मशागतीची कामे खोळंबली. मे महिन्यात कडक उन्हाच्या चटक्यामुळे जमिनीची होणारी 'लाही' यंदा झाली नाही उलट हा पाऊस शेतजमीन 'थंड' करून गेला. याचा परिणाम पिकांच्या उत्पादनावर खरिप हंगामात होणार असे शेतकरी सांगतात. या पावसाने पाणी टंचाईचा प्रश्न मात्र सोडवला. नदी-नाले प्रवाहीत झाले. कुठे दुथडीभरून वाहिले. विहिरी, बोरला नवे पाणी आले. छोट्या-मोठ्या तलावात काही प्रमाणात जलसाठाही झाला. शेत शिवाराबरोबरच डोंगरदऱ्यातील पडीक जमिनी हिरव्या झाल्या. एकूणच गेल्या महिनाभरापासून पडत असलेल्या या पावसाने निसर्गाचे एकूण चित्रच बदलून टाकले आहे. मे महिन्यातला हा पाऊस आम्ही प्रथमच अनुभवत आहोत असे जुनी वयोवृद्ध मंडळी सांगत आहेत.

सोळा-सतरा वर्षात म्हणजे २००९ नंतर प्रथमच यंदा मान्सून भारतात नेहमीपेक्षा दहा-बारा दिवस अगोदर दाखल झाला आहे. पाऊस लवकर दाखल होण्याबरोबरच तो आपल्याकडे जोरदार बरसणार आहे. त्याची चुणूक गेल्या काही दिवसांपासून मान्सूनपुर्व पावसाच्या रूपाने आपण अनुभवत आहोत. यंदा पाऊस वार्षिक सरासरीपेक्षा अधिक म्हणजे १०६ ते ११० टक्के बरसणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने मांडला आहे. या शिवाय हवामान अभ्यासक व इतर संस्थांचाही हाच अंदाज आहे. यामुळे शिवार यंदा पाणीदार होण्याबरोबरच पाणी टंचाईची समस्या उन्हाळ्यात रहाणार नाही. हवामान विभागाचे महासंचालक मृत्यूंजय मोहपात्रा यांनी चार दिवसापूर्वी यंदाच्या पावसाचा अंदाज जाहीर केला आहे. देशात १०८ टक्के पाऊस होईल असे त्यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र, तेलंगणा, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, बिहार, छत्तीसगड, ओडिसा, प.बंगाल, उत्तरप्रदेश या राज्यात तर दमदार पाऊस बरसणार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. यंदाच्या पावसाळ्यात 'अलनिनो' ही सक्रीय होणार नसल्याचे जाहीर केले गले आहे. जून महिन्यातच या महिन्याच्या सरासरीपेक्षा १०६ ते १०८ टक्के पावसाचा अंदाज वर्तवला गेला आहे. एकूणच यंदाचा पावसाळा दमदार असणार आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी सुखावला जाणार आहे. दमदार पावसामुळे खरीप, रब्बी हंगामात जोमदार पीक येऊन शेतमालाचे उत्पन्न वाढणार असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बदलणार आहे. पाऊस दमदार होणार असला तरी तो पिकाच्या काढणीवेळी पडू नये ही प्रार्थना शेतकऱ्यांची आहे.✻✻✻

# लोकमातेची जीवनगाथा

**महाराष्ट्राने या देशाला अनेक रत्ने दिली आहेत. त्यापैकी एक अनमोल रत्न म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर! आगामी वर्षात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्माला ३०० वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्ताने संपूर्ण देशभर त्यांच्या विचारांचा जागर होणार आहे. त्यांच्या व्यापक कार्याचा सर्वस्पर्शी आढावा घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न! अहिल्यादेवी यांच्या कर्मयोगाने भारतवर्षाचा उद्धार झाला. त्यामुळे अहिल्यादेवींचे नाव भारताच्या इतिहासात अजरामर झाले आहे.**

अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात झाला. आई सुशिलाबाई व वडील माणकोजी शिंदे यांनी त्यांच्यावर सुसंस्कार घडवले. लहानपणापासूनच त्या भगवान शंकराच्या निस्सीम भक्त होत्या. स्वभावाने शांत, संयमी असलेल्या अहिल्यादेवींचे तेज पाहून मराठी साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकरांनी त्यांना आपली सून बनवण्यासाठी मागणी घातली. मल्हाररावांचा पुत्र खंडेरावांबरोबर त्यांचा इ.स. १७३३ मध्ये विवाह झाला. अहिल्या शिंदे अहिल्यादेवी होळकर बनल्या. मल्हाररावांनी उत्तम शिक्षक नेमून त्यांना लेखन, हिशेब, राज्यकारभार, घोडेस्वारी आदी सर्व प्रकारचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली, या साऱ्या विद्या अहिल्यादेवींनी तन्मयतेने आत्मसात केल्या व पुढील काळात लोककल्याणार्थ त्याचा योग्य वापर केला.

**उत्तम प्रशासक :-**

लोककल्याणकारी राज्यकारभार कसा करावायाबाबत अहिल्यादेवींचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्या आदर्श प्रशासक होत्या. वर्तमानकाळातही त्यांची लोककल्याणकारी राज्यपद्धती अनुकरणीय आहे. अहिल्यादेवींनी अल्पकाळात राज्यकारभाराचे ज्ञान मिळवून उत्तम राज्य चालवले. स्वत: मल्हारराव त्यांच्याबद्दल म्हणत 'आम्ही तलवार गाजवतो ती सूनबाईंच्या भरवशावर.' मार्तंडानेच हे रत्न आम्हास दिले. अशी त्यांची भावना होती. अहिल्यादेवींच्या चरित्रकार विजया जहागीरदार लिहितात - रोज फडणीशीत जावे, हिशेब बघावे, वसूलजमा बघावी, त्यासाठी माणसे पाठवावी, फौजा तयार ठेवाव्या, खासगी उत्पन्न आणि सरकारी उत्पन्न रोखठोकपणे वेगळे ठेवावे, गोळाबारूद, बाणभाते, ढाली तलवारी सज्ज राखाव्या, सासऱ्याच्या बरहुकूम सर्व रवाना करावे हे अहिल्यादेवींचे नित्यकार्य होते. मल्हाररावांच्या अनुपस्थितीत त्या समर्थपणे सर्व कारभार सांभाळत होत्या. म्हणूनच सर जदूनाथ सरकार लिहितात, 'अस्सल कागदपत्रानिशी हे सिद्ध करता येते की, अहिल्यादेवी या अव्वल दर्जाच्या मुत्सद्दी होत्या. त्यांच्या सहकार्याशिवाय महादजी शिंदे यांना राजकारणात श्रेष्ठत्व मिळाले नसते, म्हणून माझा त्यांच्या विषयीचा आदर अमर्याद वाढला आहे. अहिल्यादेवी स्वभावाने शांत असल्या तरी करारीपणा हा त्यांचा स्वभावगुण होता. हिशेबाच्या बाबतीत त्या फार दक्ष असत. सरकारी खजिन्यातील एक छदामही सरदाराने खासगीसाठी खर्च करू नये, असा त्यांचा दंडक होता. पती असो वा मुलगा या सर्वांनाच त्यांनी या तत्त्वाचे पालन करावयास लावले.

लोककल्याणकारी राज्य कौटील्य अर्थशास्त्रात राजाच्या कर्तव्यविषयी 'प्रजा सुखे सुखं राज्ञ: प्रजानां तू हिते हितम' असे म्हटले आहे, याचा अर्थ प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे व प्रजेच्या हितातच त्याला स्वहित दिसले पाहिजे. या तत्त्वाचे पालन अहिल्यादेवींच्या चरित्रात दिसून येते. इ.स.१७५४ मध्ये कुंभेरीच्या लढ्यात पती खंडेरावांना वीरमरण आले. मल्हाररावांनी अहिल्यादेवींना सती जाण्यापासून रोखले; पण त्या दिवसापासून अहिल्यादेवींनी आपले सारे अलंकार याचा त्याग करून केवळ शुभ्र वस्त्र परिधान करायला सुरुवात केली आणि लोककल्याणासाठी आयुष्य वेचण्याची शपथ घेतली आणि उर्वरित आयुष्यात त्यांनी त्याप्रमाणे लोककल्याणाचे कार्य केले. भारतभर त्यांनी नद्यांना घाट बांधले. विहिरी खोदल्या. प्रवासी मार्गांवर अन्नछत्र, धर्मशाळा सुरू केल्या. असंख्य हिंदू मंदिराचे जीर्णोद्धार केले. देव, धर्म आणि ब्राह्मणांचे रक्षण केले. लोकांना रोजगार दिला. कलाकार, कारागीर



यांना राजाश्रय दिला.

**धर्मपरायणता:-** 'धर्मो रक्षति रक्षित:' या वचनाप्रमाणे आपण धर्माचे रक्षण केले तर धर्म आपले रक्षण करतो, याची जाणीव अहिल्यादेवींना होती. आपली संस्कृती भोगापेक्षा त्यागावर उभी आहे त्यामुळे धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली. त्याग आणि सेवा म्हणजे ईश्वर भक्तीचेच प्रकार आहेत असे त्या मानत असत. अहिल्यादेवी बालपणापासून नि:स्सीम शिवभक्त होत्या. धर्मपरायण होत्या. कुठलाही भेदभाव न करता त्यांनी राजधर्माचे पालन केले. त्यांनी अनेक मंदिरांना वर्षासने दिली. अनेक पंडित, ब्राह्मण यांना तीर्थयात्रेची सुविधा उपलब्ध करून दिली. वज्रादपि कठोराणि, मृदूनि कुसुमादपि/राज्यकर्त्यांना राज्याच्या रक्षणासाठी वज्राहून कठोर आणि प्रजेच्या पालनासाठी फुलाहून मऊ, संवेदनशीलतेने काही निर्णय घ्यावे लागतात. या दोन्ही दोन टोकाच्या भूमिका अहिल्यादेवींनी समर्थपणे पार पाडल्या आणि आपल्या कर्मयोगाने एका आदर्श राज्यकर्त्याचे उदाहरण घालून दिले. मल्हाररावांच्या निधनानंतर त्यांनी होळकरांची राजधानी इंदौरहून महेश्वर येथे स्थापन केली. नर्मदेच्या काठी भव्य घाट, शिव मंदिर आणि स्मृतिमंदिरे उभारली. अनेक लोकोपयोगी वास्तूंचे निर्माण केले. यातून अनेक कारागीर, कलाकार यांना रोजगार मिळाला. अनेक उत्तम विणकरांना महेश्वरला आणून त्यांनी वस्त्रोद्योगाला चालना दिली. आजही माहेश्वरी साडी जगप्रसिद्ध आहे. त्यांनी जनसामान्यांची काळजी तर घेतलीच; पण पशुपक्ष्यांसाठी जंगल आणि कुरणे सुरक्षित केली. अगदी मुंग्यांसाठी साखर, पाण्यातील माशांसाठी खाद्य उपलब्ध करून दिले. यातून त्यांची संवेदनशीलता दिसून येते. व्यक्तिगत जीवनात पतीचे निधन, मुलाचे निधन, जावयाच्या मृत्युनंतर मुलीचे सती जाणे असे दु:खाचे आघात सोसूनही त्याचा कुठलाही परिणाम त्यांनी राज्यकारभारावर होऊ दिला नाही. अशाही परिस्थितीत त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांच्या एका पत्रामुळे होळकरांचे राज्य घेण्याचा मनसुबा बाळगणाऱ्या राघोबादादालाही माघारी फिरावे लागले होते. 'न घेतले हे व्रत आम्ही अंधतेने' याची सदैव जाणीव ठेवून आपले संपूर्ण आयुष्य लोककल्याणासाठी समर्पित करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र संपूर्ण देशासाठी नेहमीच प्रेरणा देणारे ठरले आहे आणि भविष्यातही ते आपल्याला प्रेरणा देत राहील.

**- डॉ.पुष्कर रमेश शास्त्री**

(लेखक हे इतिहास अभ्यासक आणि संशोधक आहेत.)

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
✻ वर्ष ०९ ✻ अंक ०४ ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) मंगळवार, दि. ०३ जून २०२५ ✻ किंमत : २ रू.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणेतून मिळेल विकासाची नवी दिशा!




- चौंडी येथील स्मृतिस्थळाचा तीर्थस्थळ विकास आराखड्यात समावेश, यासाठी ६८१.३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर; आणखी ७ तीर्थस्थळांचा विकास प्रस्तावित
- ऐतिहासिक जलस्रोतांच्या जतन व संवर्धनासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर; आणखी ३४ जलस्रोतांचे पुनरुज्जीवन व सुशोभीकरण करून इतिहासाला नवसंजीवनी देण्यात येणार
- अहिल्यानगर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अत्याधुनिक रुग्णालयाची स्थापना करण्यात येणार; १०० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व ४३० खाटांचे रुग्णालय लवकरच उभारण्यात येणार
- धनगर समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृह योजनेचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना' असे करण्यात येणार
- नारी शक्तीचा जागर करण्यासाठी, महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान' आणि 'आदिशक्ती पुरस्कार योजना' राबविणार
- अहिल्यानगर येथे मुलींसाठी विशेष शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणार
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित बहुभाषिक चित्रपटाची निर्मिती करण्यात येणार

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in | MaharashtraDGIPR | MahaDGIPR

## कन्हेवाडी परिसरात दुभाजकावर रेडियम बसवून योग्य त्या उपाययोजना करा - ॲड.मनोज संकाये



परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी अंबाजोगाई महामार्गावर प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने कन्हेरवाडी जवळ असलेल्या माजी आ.कै.रघुनाथराव मुंडे पेट्रोल पंपा जवळ दुभाजक बसवला आहे. हा दुभाजक प्रवाशांची आणि वाहनधारकांची डोकेदुखी ठरत आहे. दोन दिवसांपूर्वी येथे अपघात झाल्याची घटना घडली असून त्या दुभाजकावर रेडियम बसवून योग्य त्या उपाययोजना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने कराव्यात अशी मागणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे मुख्यअभियंता यांच्याकडे केली आहे.

गेल्या आठ दिवसापूर्वी कन्हेरवाडी येथे रघुनाथ राव मुंडे पेट्रोल पंपाजवळ बसवलेल्या दुभाजकामुळे एका बसचा आणि फोर व्हीलर चा अपघात झाला. सुदैवाने या अपघातामध्ये प्रवासी सुखरूप बाहेर पडले. अशा घटना वारंवार घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे या दुभाजकावर रेडियम सह अन्य उपाययोजना कराव्यात जेणेकरून वाहनधारकांना दुभाजक समजेल त्यामुळे असे अपघात टाळता येतील तसेच प्रवाशांचा जीव वाचवता येईल. वाहनधारकाला परळी मार्गे किंवा अंबाजोगाई मार्गे येताना रेडियम नसल्यामुळे हे दुभाजक दिसत नाहीत त्यामुळे अपघात मोठ्या प्रमाणावर होत आहेत हे टाळण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे. प्रवाशाची सुरक्षितता ही महत्त्वाची आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने त्वरित रेडियम सह योग त्या उपयोजना करून होणारे अपघात टाळावेत अशी मागणी त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांच्याकडे केली आहे. **

## मयत ऊसतोड कामगारांच्या कुटुंबियांची मंत्री संजय राठोड यांनी भेट घेऊन केले सानुग्रह अनुदान वाटप



बीड (जिमाका): माजलगाव तालुक्यातील वारोळा (आश्रमशाळा तांडा) येथे नुकत्याच झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या ऊसतोड कामगारांच्या कुटुंबियांची मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांत्वनपर भेट दिली व शासनामार्फत श्रीमती छबुबाई पिराजी राठोड यांना सानुग्रह अनुदानाच्या धनादेशाचे वितरण केले. या प्रसंगी मंत्री राठोड यांनी कुटुंबियांची भावनिक समजूत घेतली आणि राज्य सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. सानुग्रह आर्थिक सहाय्य देण्यात आले असून, याशिवाय पुढील मदतीसाठीही शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी माजलगाव चे तहसीलदार, गट विकास अधिकारी, बंजारा समाजाचे पि,टी ,चव्हाण, बाबुराव जाधव, शरद चव्हाण, जीवन राठोड, स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ, प्रशासनातील अधिकारी तसेच मयतांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. मंत्री राठोड यांच्या या दौऱ्यामुळे पीडित कुटुंबीयांना थोडासा दिलासा मिळाला असून, ग्रामस्थांनी त्यांच्या या तत्परतेचे स्वागत केले आहे.*

## परळीत राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आल्याची माहिती ओबीसी परिषदेचे तालुका अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते विलासराव ताटे यांनी दिली.

परळी येथील १२ ज्योर्तिलिंगापैकी प्रसिध्द असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या मंदिर परिसरातील अहिल्याबाई होळकर यांना नम्रपूर्वक अभिवादन करण्यात आले. अहिल्याबाईंनी प्रभू वैद्यनाथांचे मंदिराचा जीर्णोद्धार केला आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी सर्व समाजासाठी आपला लढा दिला. शासनाने महाराष्ट्रातील अहमदनगर या शहराचे नाव अहिल्यानगर केले. त्याबद्दल भिमराव सातपुते यांनी अभिनंदन केले. पण शासनाने जाहिर केलेल्या धनगर समाजासाठीच्या योजना तळागाळापर्यंत पोहचत नसल्याने समाजाला त्याचा पूर्णतः फायदा होत नसल्याचे खंत व्यक्त केली. शासनाने तळागाळापर्यंत सर्व योजना पोहचवून त्यातील अडचणी दूर कराव्यात अशी मागणी सातपुते यांनी केली. सकाळी वैद्यनाथ मंदिर परिसरातील राजमाता अहिल्याबाई होळकर यांना भिमराव सातपुते, विलासराव ताटे, अमोल सातपुते, डॉ.अरूण गुट्टे, मिलिंद घाडगे, प्रसन्नजीत रोडे आदींनी नम्रपूर्वक अभिवादन केले. ***

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई (दुरध्वनीक्रमांक ०२४४६-२४७७६०)**

**ई-निविदा सुचना क्रमांक :- ब-१ एबीजे-०५/२०२४-२६ (ऑन लाईन)**

**(फक्त बीड जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई ई निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा, महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील फक्त बीड जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था कडून मागवित आहेत. या निविदामध्ये परळी तालुक्यातील १ कामाचा समावेश आहे. सदर ब-१ नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत. ई निविदेबाबतचा इतर संपूर्ण तपशील खालील संकेतस्थळावर (Web Site) उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**सुचना :-**

१) ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी https://mahatenders.gov.in या Portal वर enrolled करावे.

२) कोणत्याही किंवा सर्व कामाच्या ई-निविदा, कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे. ३) निविदा ऑनलाईन सादर करावयाच्या प्रक्रियेत कोणत्याही कारणामुळे अडथळा आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. ४) वरील निविदा सुचना ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वेब साईटवर www.mahapwd.com पहावयास मिळेल.

स्वाक्षरीत/-

**कार्यकारी अभियंता,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई**

**जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/३४**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड**

**ई-मेल:-** ambejogai.ee@mahapwd.com **दुरध्वनी/फॅक्स क्र.:** (०२४४६) २४७७६०/२४९५७५

**निविदा सुचना क्र.०५ सन २०२५-२६**

**(फक्त बीड जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था साठी)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील दर्शविलेल्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था कडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध व स्विकृती कालावधी दि.०३/०६/२०२५ ते ११/०६/२०२५ रोजी १८.५५ वाजेपर्यंत राहील व शक्य झाल्यास ई-निविदा उघडणे दि.१३/०६/२०२५ रोजी ११.०० वाजे पासून पुढे राहील.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मौजे मिरवट येथे ग्रामपंचायत मालकीच्या जागेवर शादीखाना बांधकाम करणे. ता.परळी वै.जि.बीड | २०,६६,१०१/-<br>(वीस लक्ष सहासष्ट हजार एकशे एक रू.फक्त) | २०,७००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग - ब व त्यावरील |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) https://mahapwd.com २) https://mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई कार्यालयातील सुचना फलक.

स्वाक्षरीत/-

**कार्यकारी अभियंता,**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई**

**जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/३४**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**OFFICE OF EXECUTIVE ENGINEER,**

**PUBLIC WORKS DIVISION, AMBAJOGAI DIST.BEED**

E-Mail:- ambejogai.ee@mahapwd.com Phone/Fax : (02446) 247760/249575

**E-TENDER NOTICE NO.: 05 OF 2025-2026**

**(Only for Beed District Labour Co-Operative Societies)**

Online tenders for following works are invited by Executive Engineer, Public Works Division, Ambajogai Dist.Beed. from Labour Co-Operative Societies registered with Goverment of Maharashtra in appropriated class. Tender Documents download from Web site of https://mahaternders.gov.in, Right to accept or reject tenders is reserved by Executive Engineer, P.W. Division, Ambajogai.

The Blank Tender forms available for download & submission from 03/06/2025 to 11/06/2025 to upto 18:55 Hrs.The Bid Opening on or after 13/06/2025 from 11.00 Hrs.

| Sr. No. | Name of Work | Estimate Cost (Rs.) | Earnest Money (Rs.) | Cost of E-Tender from (Rs.) | Period of comple-tion | Class of Contractor |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | Construction of Shadikhana on the land owned by the Gram Panchayat at Muje Mirwat Tq.Parli Dist.Beed | 20,66,101/-<br>(Twenty Lakh Sixty Six Thousand One Hundred One Rupies Only) | 20,700/- | 590/- | 06 Month | Class-B & Above |

Information about E-Tender is available on following web site.

1. https://mahapwd.com 2. https://mahatenders.gov.in

(If any changes made in tender notice will published on above web site.)

3. On Information Board in the Office of Executive Engineer, Public Works, Divistion, Ambajogai.

Sign.

**Executive Engineer,**

**Public Works Division, Ambajogai.**

**जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/३४**